यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई



# वार्षिक अहवाल

# १९९५-९६



# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्रकाशित ग्रंथ

## विक्रीसाठी उपलब्ध

| | | किंमत रु. |
|---|---|---|
| १. | **यशवंतराव चव्हाण मौलिक विचार**<br>संकलन : ना. धों. महानोर | ३.५० |
| २. | **म. फुले निवडक विचार**<br>संकलन व संपादन : गजमल माळी | १२.०० |
| ३. | **''सह्याद्रीचे वारे''**<br>यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ४. | **यशवंतराव चव्हाण : विधीमंडळातील निवडक मराठी भाषणे** (भाग १)<br>संकलन : डॉ. श्री.जी. खांबेकर | २००.०० |
| ५. | **वाय.बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधीमंडळ** (भाग २)<br>संकलन : डॉ. श्री.जी. खांबेकर | २५०.०० |
| ६. | **पंचायतराज्य, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास**<br>संपादन : प्रा. पी.बी. पाटील | १००.०० |
| ७. | **बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास**<br>संपादक : वि.स. पागे | ३५.०० |
| ८. | **महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन**<br>संपादन : अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ९. | **महाराष्ट्र : 'एक दृष्टीकोन' (श्री. शरदराव पवार - भाषण संग्रह)**<br>संपादन : दादासाहेब रूपवते | ५५.०० |
| १०. | **नवभारत : परिवर्तनाची दिशा**<br>संपादक : प्रा. पी.बी. पाटील | ५५.०० |
| ११. | **''सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट बाय वाय.बी. चव्हाण''** (भाग १ व २)<br>संपादन : राम प्रधान (अमेय प्रकाशन, पुणे) | २५०.०० |


**यशवंतराव चव्हाण केंद्र**

जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ८५ ९८ / २८५ २० ८१ / २०४ ५८ ६०

फॅक्स : ९१-०२२-२८५२०८३

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई


## विश्वस्त मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. दादासाहेब रूपवते | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. मोहन धारिया | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. डॅ. राजा भोसले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. अरुण डहाणूकर | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. डॉ. व्ही. सुब्रमण्यन् | मानद संचालक |
| ७. | मा. श्री. सुधाकरराव नाईक | |
| ८. | मा. श्री. शिवजीराव पाटील-निलंगेकर | |
| ९. | मा. डॉ. निळकंठराव कल्याणी | |
| १०. | मा. प्रा. पी.वी. पाटील | |
| ११. | मा. श्री. राम प्रधान | |
| १२. | मा. श्री. गुलाम गौस | |
| १३. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १४. | मा. श्री. वसंत कार्लेकर | |
| १५. | मा. श्री. शरद उपासनी ) | महाराष्ट्र शासन |
| १६. | मा. श्री. वी.एन. बहादुर ) | प्रतिनिधी |

## कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. दादासाहेब रूपवते | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. मोहन धारिया | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. डॅ. राजा भोसले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. अरुण डहाणूकर | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. डॉ. व्ही. सुब्रमण्यन् | विश्वस्त मानद संचालक |
| ७. | मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील | |
| ८. | मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| ९. | मा. श्री. ना.धों. महानोर | |
| १०. | मा. श्री. हुसेन दलवाई | |
| ११. | मा. श्री. नरेंद्रजी तिडके | |
| १२. | मा. श्री. एन.के.पी. साळवे | |
| १३. | मा. श्री. के.वी. आवाडे | |
| १४. | मा. श्री. ह.गो. वर्तक | |
| १५. | मा. श्री. वी.जी. शिर्के | |
| १६. | मा. श्री. प्रतापराव भोसले | |
| १७. | मा. श्री. शिवजीराव गि. पाटील | |
| १८. | मा. श्री. पी.डी. पाटील | |
| १९. | मा. श्री. अंकुशराव टोपे | |
| २०. | मा. श्री. विष्णुआण्णा पाटील | |

## कार्यकारी समिति

१ मा. श्री. शरदराव पवार

२. मा. श्री. दादासाहेब रूपवते

३. मा. श्री. मोहन धारिया

४. मा. डॅ. राजा भोसले

५. मा. श्री. अरुण डहाणूकर

६. मा. डॉ. व्ही. सुब्रमण्यन्

७. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे

८. मा. श्री. हुसेन दलवाई

श्री. जि.ल. परब संचालक (प्रशासन)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| **महाराष्ट्र महिला व्यासपीठ** | संयोजिका | — | श्रीमती नीलम गोऱ्हे |
| **नवभारत युवा आंदोलन** | संयोजक | — | श्री. प्रेमानंद रूपवते |
| | संघटक | — | श्री. दत्ता बाळसराफ |
| **कृषि व सहकार व्यासपीठ** | निमंत्रक | — | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| | संयोजक | — | श्री. त्र्यं.भा. खेडकर |
| **मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला उपक्रम** | अध्यक्ष | — | डॉ. राजा भोंसले |
| | सचिव | — | श्री. एम.वी. पवार |
| **यशवंतराव चव्हाण ग्रंथालय** | ग्रंथालय सल्लागार | — | श्रीमती पी.ए. निंबाळकर |
| | ग्रंथपाल | — | श्री. व्ही.आर. कामत |
| **यशवंतराव चव्हाण सभागृह (ऑडिटोरियम)** | व्यवस्थापक | — | श्री. विजय देसाई |
| **यशवंतराव चव्हाण कलादालन** | व्यवस्थापक | — | कु. उज्वला आडिवरेकर |
| **पंचायत राज प्रशिक्षण प्रकल्प** | मानद सल्लागार | — | डॉ. व्ही.वी. मांडलेकर |
| | आर्थिक सल्लागार | — | श्री. व्ही. गणपती |
| **प्रथम - प्राथमिक शिक्षण उपक्रम** | कार्यकारी सचिव | — | डॉ. माधव चव्हाण |
| **मानद वास्तू विशारद** | | — | मे. शशी प्रभु अॅण्ड असोशिएटस् |
| **यशवंतराव चव्हाण केंद्र इमारत देखभाल** | मानद सल्लागार (इंजिनियरींग) | — | श्री. एम.डी. काळे |
| | कन्सल्टींग इंजिनियर | — | श्री. के.टी. अय्यंगार |
| **सांविधिक लेखा परीक्षक** | | — | मेसर्स के.वी. म्हेत्रे आणि कंपनी |
| **अन्तर्गत लेखा परीक्षक** | | — | मेसर्स पांक्षे-कुलकर्णी आणि कंपनी |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## सन १९९५-९६ चा अहवाल

१) **कार्यकारी समितीचे कामकाज :-**

प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत असून त्याची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी समितीच्या बैठका वेळोवेळी झाल्या. या बैठकांमध्ये विश्वस्त मंडळाने सन १९९५-९६ च्या काळात जे कार्यक्रम घ्यावयाचे ठरविले होते, त्यासंबंधी आखणी करण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात आली. कार्यालयातील सदस्य, प्रतिष्ठानचे अधिकारी, कर्मचारी आणि विविध विभागांचे प्रमुख नियमितपणे आपले कामकाज करीत असतात.

२) **यशवंतराव चव्हाण सेंटर म्हणजेच केंद्रीय इमारतीमधील उपक्रम :-**

(१) **मुख्य सभागृह व परिषद गृह (कॉन्फरन्स हॉल)** : यशवंतराव चव्हाण केंद्रीय सभागृहाचा आणि परिषद गृहाचा वापर प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था व शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिसंवाद, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. मराठी, गुजराथी, हिंदी व इंग्रजी नाटके, संगीत सभा आदी कार्यक्रमही वर्षभर झाले. विविध सोयी उपलब्ध केल्यामुळे प्रतिष्ठानच्या सभागृहाला तसेच परिषद गृहाला सारखी मागणी असून वर्षभर कार्यक्रम सुरु असतात.

(२) **ललित कला दालन** : मध्यवर्ती केंद्रातील ललित कला दालनामध्ये रंगचित्रे, छायाचित्रे, रेखाटनचित्रे, पॉटरी सारख्या हस्तकलेच्या वस्तू यांची विविध प्रदर्शने झाली. नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलादानलातर्फे 'मान्सून शो' तसेच ज्येष्ठ कलाकारांसाठीही 'मान्सून शो' आयोजित करण्यात आले. अखिल भारतीय कला मेळावा कलकत्ता येथे ललित कला अकादमीतर्फे आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण कलादालन सहभागी झाले. यामुळे यशवंतराव चव्हाण केंद्र आणि कलादालनाला चांगली प्रसिद्धी मिळाली.

देश व महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या परिषदा व चर्चासत्रे घेण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य सभागृह तसेच ललित कला केंद्र अत्यंत अल्प दरात देण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणीही सुरु आहे.

(३) **सांस्कृतिक विभाग** : वार्षिक वर्गणी रु. ५००/- देऊन कोणत्याही व्यक्तीस अथवा रु. ७५०/- देऊन पती-पत्नी यांना रंगस्वरचे सभासद होता येते. अशा सदस्यांना रंगस्वरतर्फे होणाऱ्या नाट्य, चित्रपट, गायन आदी कार्यक्रमांचा आस्वाद सवलतीच्या दरात घेता येतो. ही सवलत प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांसाठी सुद्धा उपलब्ध आहे.

४) **यशवंतराव चव्हाण ग्रंथालय :**

ग्रंथालयाच्या उद्दिष्टाप्रमाणे ग्रंथालयासाठी राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शेती, सहकार, पर्यावरण, महाराष्ट्राची संस्कृति व इतिहास, कायदा, ग्रामीण प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, शिक्षण आदी अनेक विषयावरील पुस्तके विकत घेण्यात आली आहेत. कै. यशवंतराव

यांच्या विचाराशी सुसंगत आणि प्रतिष्ठानने सुरु केलेल्या कार्यक्रमांना पूरक असे हे विषय आहेत. ग्रंथालयामध्ये माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी पुस्तके व त्यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके आहेत. संदर्भ ग्रंथालयाच्या धर्तीवर यशवंतराव चव्हाण संदर्भ ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. १ मार्च १९९६ पासून ग्रंथालय सभासदांसाठी खुले करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

ग्रंथालयात आता ८४०० मौल्यवान पुस्तके असून संगणकावर त्यांची नोंदणी करण्याचे काम सध्या सुरु आहे. वाचकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिनची व्यवस्था करण्यात आली आहे. १ एप्रिल १९९५ पासून ३१ मार्च १९९६ या काळात रु. ४,४५,४००/- रुपयांची ग्रंथखरेदी करण्यात आली आहे. सर्व ग्रंथांची निवड ग्रंथालय समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येते.

प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांना यशवंतराव चव्हाण ग्रंथालय विनामूल्य उपलब्ध आहे.

५) **केंद्रीय इमारतीमधील प्रशिक्षण केंद्र** :

केंद्रीय इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील एका कक्षामध्ये प्रशिक्षण केंद्रासाठी प्रतिष्ठानने जागा उपलब्ध करुन दिली आहे. प्रशिक्षण केंद्रासाठी युरोपीयन युनियनने साहकार्य दिले असून त्यांच्या मदतीने प्रशिक्षण सुरु आहे. या केंद्रामध्ये भारत, युरोपीय देशातील आर्थिक व कृषि विषयक उपक्रमांची माहिती देऊन या देशातील व्यापार वाढावा म्हणून प्रशिक्षण द्यावयाचे ठरले आहे. त्याच हेतूने तज्ज्ञांबरोबर चर्चा किंवा बैठकाही आयोजित करण्यात येतात.

६) **विभागीय केंद्रे** :

प्रतिष्ठानचे कार्य महाराष्ट्रभर पसरावे हे प्रतिष्ठानचे एक प्रमुख उद्दिष्ठ आहे. म्हणूनच मागील वार्षिक बैठकीत ठरल्याप्रमाणे विभागीय केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या त्या परिसरातील विश्वस्त व प्रमुख सदस्यांना पत्रे पाठविण्यात आली आहेत. विभागीय केंद्रांची जबाबदारी घेण्यासाठी संबंधितांबरोबर चर्चाही सुरु आहे. प्रतिष्ठानतर्फे विभागीय कार्यालयांना काही प्रमाणात अनुदान देण्याचेही ठरले आहे.

७) **अनुबोधपट** :

प्रतिष्ठानतर्फे खालील अनुबोधपट तयार झाले असून त्यापैकी काही प्रदर्शित झाले आहेत.

(१) श्री. एस्.एम्. जोशी - प्रदर्शित झाला व व्हिडीओ कॅसेट काढण्यात आली.
(२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - प्रदर्शित झाला.
(३) कवि कुसुमाग्रज - प्रदर्शित झाला.
(४) श्री पु.ल. देशपांडे - तयार झाला आहे. लवकरच प्रदर्शित होईल.
(५) डॉ. डांगे यांच्यावरील अनुबोधपट श्री विनय नेवाळकर तयार करीत असून बाकी सर्व चित्रपट डॉ. जब्बार पटेल यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झाले व त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. तसेच चव्हाण साहेबांवरील चित्रपटाबाबत डॉ. जब्बार पटेल यांच्याशी वेळोवेळी चर्चा झाली. हा चित्रपट तयार करण्यासाठी अग्रक्रम देण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

## ८) खुली निबंध स्पर्धा :

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे सन १९९५ साली खुली निबंध स्पर्धा खालील तीन विषयांवर आयोजित करण्यात आली होती.

(१) महात्मा गांधींचे विचार आजच्या घडीला किती लागू पडतात?
(२) टी.व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे या प्रसार-प्रचार माध्यमांचे अनिर्बंध स्वातंत्र्य - शाप की वरदान.
(३) मुक्त अर्थव्यवस्था : फायदे, तोटे व पथ्य - पाणी.

ही खुली निबंध स्पर्धा प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, संशोधक, वृत्तपत्रलेखक, प्रौढ नागरिक यांसाठी खुली होती. निबंध स्पर्धेसाठी खालील प्रमाणे पारितोषिके ठेवण्यात आली होती-

(अ) प्रथम पारितोषिक रु. २,५००/-
(ब) द्वितीय पारितोषिक रु. २,०००/-
(क) तृतीय पारितोषिक रु. १,५००/-

निवड समितीने निवड केलेल्या विजेत्यांना यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनी दि. (१२.३.९६) रोजी ही पारितोषिके प्रदान करण्यात आली.

## ९) यशवंतराव चव्हाण राज्य स्तरीय पारितोषिक :

खालील क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती वा संस्थेला चक्रीय पद्धतीने दरवर्षी राज्य स्तरीय पारितोषिक व मानपत्र देण्यात येते.

(१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाज रचना पारितोषिक
(२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक
(३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास पारितोषिक
(४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती पारितोषिक.

दिनांक २५/११/९५ रोजी मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पुण्यतिथीचे दिवशी यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक सुप्रसिद्ध समाजसेविका श्रीमती शांताबाई दाणी यांना देण्याचे जाहीर करण्यात आले व दि. १२/३/९६ रोजी झालेल्या जयंती कार्यक्रमाच्या वेळी डॉ. फारुख अब्दुल्ला, माजी मुख्यमंत्री, जम्मू व काश्मीर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. १९९४ सालचे यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना पारिपोषिक श्री. नारायण महादेव चमणकर, वेंगुर्ले यांना देण्यात आले.

## १०) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व मानपत्र :

कै. यशवंतरावजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी राष्ट्रीय एकात्मता लोकशाही आणि आर्थिक विकास या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट सेवा करणाऱ्या नामवंत व्यक्तीला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व मानपत्र देण्यात येते. पुरस्काराची रक्कम एक लाख रुपये असून सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायधीश न्या. वाय्.व्ही. चंद्रचूड यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. डॉ. एम्.एस्. स्वामिनाथन, डॉ. वसंतराव गोवारीकर, डॉ. होमी सेठना व के.सी. पंत हे समितीचे सदस्य आहेत. त्यांनी केलेल्या निवडीनुसार हा पुरस्कार देण्यात येतो. सन् १९९४ चा राष्ट्रीय पुरस्कार

श्री मधू दडवते यांना माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखर यांच्या हस्ते दिनांक २५/११/९५ रोजी माननीय श्री. दादासाहेब रूपवते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात देण्यात आला. सन १९९५ च्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी पंजाबचे माजी मुख्यमंत्री सरदार बियंतसिंग यांची निवड (मरणोत्तर) समितीने केली होती. त्याप्रमाणे १२ मार्च १९९६ रोजी मा. यशवंतरावजी यांच्या ८३ व्या जयंती कार्यक्रमामध्ये जम्मू काश्मिरचे माजी मुख्यमंत्री डॉ. फारुख अबदुल्ला यांच्या हस्ते सरदार बियंतसिंग यांच्या पत्नी श्रीमती जसवंत कौर यांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व मानपत्र प्रदान करण्यात आले.

कै. यशवंतरावजी चव्हाण यांची जयंती व स्मृती दिना निमित्त कार्यक्रम प्रतिष्ठानतर्फे कराड व मुंबई येथे दरवर्षी साजरे करण्यात येतात

११) **प्रतिष्ठान प्रकाशने -**

(१) श्री. राम प्रधान यांनी यशवंतरावजी चव्हाण यांच्या संसदेतील गृह व संरक्षण खात्याविषयक भाषणांवर आधारीत संकलित केलेले ''सिलेक्टेड स्पिचेस इन पार्लमेंट बाय वाय.बी. चव्हाण'' या पुस्तकाच्या दोन खंडांचे प्रकाशन भारताचे मा. पंतप्रधान श्री. पी.व्ही. नरसिंहराव यांच्या शुभहस्ते दि. १९ डिसेंबर १९९५ रोजी पार्लमेंट हाऊस - अनेक्स, नवी दिल्ली येथे भव्य समारोहात करण्यात आले. मा. श्री. शिवराज पाटील, अध्यक्ष लोकसभा यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते.

(२) 'सह्याद्रीचे वारे' या मराठी पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर प्रा. गौरी देशपांडे यांनी केलेले आहे. इंग्रजी भाषांतर पुस्तकरुपे प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुस्तक 'अमेय प्रकाशन' पुणे यांच्याकडे छापण्यासाठी दिलेले आहे. पुस्तक छपाईनंतर विशेष समारंभात त्याचे विमोचन करण्यात येईल.

(३) मा. यशवंतरावजी यांच्या कागदपत्रांची छाननी श्री. राम प्रधान करीत असून त्यावर आधारीत खंड प्रकाशित करण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतला आहे.

(४) **भारतीय भटक्या व विमुक्त जाती विकास व संशोधन प्रकल्प :-** श्री. लक्ष्मण माने यांनी प्रतिष्ठानच्या सहयोगाने 'विमुक्त जमात - एक चिकित्सक अभ्यास' हा प्रकल्प खूप अडचणीवर मात करुन पूर्ण केला आहे व प्रतिष्ठानला सादर केला आहे. मौज प्रिंटींग प्रेसमार्फत या बहुमोल ग्रंथाच्या छपाईचे काम सध्या सुरु आहे.

१२) **अंधश्रद्धा निर्मूलन कार्य -**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून अंधश्रद्धा निर्मूलनाचा महत्वपूर्ण प्रकल्प डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात येत आहे. या प्रकल्पानुसार अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या शिक्षकांचे प्रबोधन करण्यात येते. सत्यशोध प्रज्ञा परिक्षा घेण्यात येते आणि यशस्वी व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात येतात. जव्हार (ठाणे), उल्हासनगर, कल्याण, पालघर, फोंडा (गोवा), सातारा, सोलापूर, सांगली, गडहिंग्लज, बेळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, उस्मानाबाद, जालना, चाळीसगाव व रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयात शिबिरे घेण्यात आली. सत्यशोध प्रज्ञा परिक्षेला एकूण 30,000 शिक्षक विद्यार्थी बसले होते. या महत्वपूर्ण कार्यक्रमाचे राज्यभर स्वागत होत असून खेडोपाडी प्रतिष्ठानचे नावही पोहोचले आहे. उर्वरित भागात हे कार्य पोहोचावे म्हणून सन १९९८ पर्यंत या संयुक्त प्रकल्पास प्रतिष्ठानने मान्यता दिली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत त्यासाठी तीन लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

13) **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन मिळून युरोपियन युनियनच्या सहकार्याने सुरु असलेला पंचायत राज्य सदस्यांचा प्रशिक्षण प्रकल्प** :-

ग्रामपंचायती पासून संसदेपर्यंत सर्व निर्वाचित लोकप्रतिनिधींचे आवश्यक प्रशिक्षण व्हावे असा मा. यशवंतरावजी चव्हाण यांचा खास आग्रह असे. ते नजरेसमोर ठेवूनच हा संयुक्त प्रकल्प प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचा खर्च सुमारे ३५० लक्ष रुपयांचा असून त्यासाठी युरोपियन युनियनच्या संबंधित कमिशनकडून रु. ८८ लाखांची मंजूरी मिळाली असून, त्यापैकी रु. २८.१४ लाखांचे अनुदान प्रतिष्ठानला मिळाले आहे. हा प्रकल्प एकट्या प्रतिष्ठानला राबविणे शक्य नव्हते, म्हणून महाराष्ट्र शासन, पंचायत राज्य संस्था, 'यशदा' यांचे सहयोग मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी झाले असून शासनाने प्रतिष्ठानला मिळणाऱ्या अनुदानाखेरीज अन्य खर्चाची जबाबदारी घेण्याचे मान्य केले आहे.

दिनांक १२, १३, १४ फेब्रुवारी १९९६ रोजी पुणे येथे 'यशदा' मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील प्रशिक्षणासाठी (रिसोर्स पर्सन्ससाठी) एक कार्यशाळा झाली. त्यामध्ये प्रतिष्ठानच्या भूमिकेची माहिती देण्यासाठी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष व विश्वस्त-संचालक सहभागी झाले. हा कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने सुरु झाला असून १२,००० ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सर्वांच्या सहकार्याने ठरल्याप्रमाणे ६५,००० सदस्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असते, परंतु लोकसभा निवडणूक आचार संहितेमुळे ते स्थगित करावे लागले. आता हे कार्य परत सुरु झाले आहे.

१४) **साक्षरता प्रकल्प (प्राथमिक शिक्षण प्रकल्प)** :-

प्रतिष्ठानतर्फे 'प्रथम प्राथमिक शिक्षण उपक्रम' या संस्थेच्या सहकार्याने प्राथमिक शिक्षण प्रकल्प (साक्षरता) राबविण्याचा निर्णय पूर्वीच घेतलेला आहे. या प्रकल्पासाठी सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई यांच्याकडून दरवर्षी रु. २५ लाख या प्रमाणे पाच वर्षासाठी १ कोटी २५ लाख रुपये मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि, शासनाने दरवर्षी रु. १५ लाख याप्रमाणे रु. ७५ लाख मंजूरी सन १९९५-९६ पासून देण्याचे आदेश काढलेले आहेत. हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी समिती स्थापन करण्याचेही आदेश शासनाने काढलेले आहेत. समिती स्थापनेबाबत व प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने न्याय व विधी विभागाच्या सचिवांशी वेळोवेळी मा. विश्वस्त - मानद संचालकांनी चर्चा केलेली आहे. विधी विभाग, सचिवांनी संबंधीतांची बैठक घेऊन प्रकल्पाची पुढील कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिलेले आहे.

रोटरी क्लब ऑफ मुंबई कडून दरवर्षी रु. ५ लाख याप्रमाणे पाच वर्षासाठी रु. २५ लाख मंजूरी मिळावयाची आहे.

१५) **यशवंतराव चव्हाण स्कॉलरशीप** :-

या योजनेअंतर्गत -

(१) श्री. गो.मा. पवार, सोलापूर यांना 'महर्षी, विठ्ठल शिंदे : जीवन व कार्य' या विषयावर रु. ७५,०००/- पर्यंत शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे. त्यापैकी रु. २५,०००/- त्यांना देण्यात आले आहेत. प्रकल्प अहवाल लवकरच मिळण्याची अपेक्षा आहे.

(२) श्री. विठ्ठल वि. पाटील, कराड यांना 'यशवंतराव चव्हाण फेलोशीप' (यशवंतराव चव्हाण : विचार व कर्तृत्व आलेखन) या विषयावर रु. ७५,०००/- ची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

१६) **गोदरेज कंपनीने विक्रोळी येथील देणगी म्हणून देऊ केलेली जमीन :-**

गोदरेज कंपनीने विक्रोळी येथील सुमारे ६ एकर जागा प्रतिष्ठानच्या उपक्रमासाठी देणगी म्हणून देण्याचे मान्य केले आहे. सदर जागा 'इंडस्ट्रियल' झोनमध्ये येत असल्याने ती 'रेसिडेंशल' झोनमध्ये अंतर्भूत करावी, म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. महानगरपालिकेने आर्किटेक्ट मार्फत कोणते उपक्रम जागेत राबविण्यात येणार आहेत ते स्पष्ट करुन प्रस्ताव सादर करावा असे निर्देशित केले आहे. त्यानुसार 'यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज ॲन्ड रिसर्च' स्थापन करण्याचा इरादा आहे.

१७) **महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-**

सन १९९५-९६ सालात प्रतिष्ठानचे काम महाराष्ट्रभर पसरावे, यासाठी बीड, नागपूर, चंद्रपूर आदी १२ जिल्हयात विभागीय काम करण्यासाठी आणि महिला व्यासपीठाच्या जिल्हा पातळीवरील संयोजनासाठी वेळ देणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्था पुढे आल्या आहेत. दिल्ली व इंदूर येथेही महिला व्यासपीठ आणि प्रतिष्ठानचे इतर कार्यक्रम राबविणारे गट तयार झाले आहेत.

एप्रिल ९५ ते डिसेंबर ९५ या कालावधीत जिल्हा पातळीवर झालेल्या विविध विषयांवरील परिषदा अथवा बैठकांमध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा सहभाग होता. या परिषदांमध्ये बीजिंग येथील जागतिक महिला परिषद, राष्ट्रीय महिला धोरण, स्वयंसेवी संस्थांची बांधिलकी, मानवी हक्क अशा विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन झाले. पुणे येथे झालेल्या स्वयंसेवी संस्थांच्या बांधिलकी कृतिसत्राचा पाठपुरावा करण्यासाठी महिला व्यासपीठाच्या नागपूर विभागातर्फे दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. जयपूर येथे झालेल्या राष्ट्रीय महिला परिषदेत महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या सहभाग होता. 'मजलीस' या संस्थेच्या सहकार्याने मुंबई येथील महिला विषयक कार्य करणाऱ्या संस्था - संघटनांसाठी 'मेमरी ऑफ फिअर' हा महिलां विषयीचा चित्रपट दाखविण्यात आला.

सावित्रीबाई फुले स्मृती शताब्दी वर्षा निमित्त जानेवारी १९९६ मध्ये नाशिक येथे आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या महिला शिबिरात महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा सहभाग होता. व्यासपीठाने तयार केलेले संबंधित विषयावरील साहित्य, सहभागी झालेल्या प्रतिनिधींना वितरित करण्यात आले. दिनांक ८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे स्त्री उत्सवाचे व महिला निर्भयता परिषदेचे आयोजन करण्यात आले. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी काय करता येईल, याबाबत विचार विनिमय करण्याकरिता महाराष्ट्र महिला व्यासपीठाने एक चर्चासत्र आयोजित केले. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती मोहिनी गिरी या चर्चासत्राला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. वेश्या व्यवसाय करणाऱ्या मुंबईतील महिलांना शासकीय कारवाई अंतर्गत ताब्यात घेण्यात आले होते. त्यातील अल्पवयीन मुलींच्या पुनर्वसनाच्या आणि सुरक्षिततेच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन या चर्चासत्रात एक तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत पुढे आलेल्या मुद्यांच्या आधारे राष्ट्रीय महिला आयोगाने उच्च न्यायालयाला निवेदन सादर करुन या संदर्भात त्वरीत कृती करण्याची विनंती केली. त्यानुसार राज्य स्तरावर वेश्या पुनर्वसन समिती स्थापन झाली आहे.

१८) **नवभारत युवा आंदोलन :**

मे १९९५ मध्ये राज्यस्तरीय 'एडस्' प्रतिबंधक प्रशिक्षण कार्यशाळा मुंबईत आयोजित करण्यात आली. त्यावेळी मान्यवरांच्या मार्गदर्शनाबरोबर एडस् प्रतिबंधक साहित्य देण्यात आले. तसेच नोव्हेंबर ९५ मध्ये कॉर्प संस्थेच्या सहकार्याने दोन दिवसाचे एडस्

प्रतिबंधक शिबिर धारावी येथे संपन्न झाले. जुलै ९५ मध्ये राज्यातील ५० स्वयंसेवी संस्थाच्या कार्यकर्त्यांचा सहभाग असलेली पंचायत राज प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. यशवंतराव चव्हाण स्मृति गुणगौरव स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. शिवाय या विषयावर एक कार्यशाळाही भरविण्यात आली. २६ नोव्हेंबर १९९५ रोजी भारतीय राज्यघटना दिन नवभारत युवा आंदोलन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ थॉटच्या सहकार्याने वरळी येथे साजरा झाला. ''ग्रंथाली वाचक चळवळ'' यानी 'युवा ग्रंथाली' असा २४/१२/९५ रोजी दादर येथे कार्यक्रम आयोजित केला होता. आंदोलनाने सुरवातीपासून यामध्ये सहभाग घेतला होता. आंदोलन आणि एकता ग्रुप मुंबई यांच्या वतीने ९ ते १२ जानेवारी ९६ पर्यंत राष्ट्रीय युवा दिना निमित्त राज्यव्यापी कला महोत्सव आयोजित करण्यात आला. या महोत्सवात सामूहिक लोकनृत्य, एकांकिका, शास्त्रीय नृत्य, आदी स्पर्धा घेण्यात आल्या. महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळाला. चेंबूर येथे 'प्रथम - प्राथमिक शिक्षण उपक्रम' यांच्या सहकार्याने व नायगाव येथे विद्यार्थी मित्र समितीच्या सहकार्याने नापास विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र सुरु केले आहे. या केंद्राला नवभारत युवा आंदोलनाकडून साहित्य आणि शिक्षण यांचे सहकार्य दिले जाते. १ फेब्रुवारी ते ३ मार्च ९६ या कालावधीत पश्चिम महाराष्ट्र व कोकण या विभागात ग्रंथाली व प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बहुजन साहित्य यात्रा काढण्यात आली. त्यात ग्रंथ प्रदर्शन, साहित्यिकांच्या मुलाखती, परिसंवाद, कवी संमेलने, आदी कार्यक्रम अंतर्भूत होते. प्रतिष्ठानच्या वतीने आंदोलनाचे कार्यकर्ते त्यात सहभागी झाले होते.

१९) **कृषि व सहकार व्यासपीठ :-**

- भारताच्या अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणावर टिपण्या तयार करुन 'शेती व सहकार' या विषयाबाबतचे निवेदन नियोजन मंडळाचे सभासद यांना सादर केले.

- नाशवंत मालाच्या (विशेषतः द्राक्ष, चिकू, व आंबा) निर्यातीसाठी उत्पादनोत्तर तंत्रज्ञानविषयक एका दिवसाचा ट्रेनिंग कोर्स यूरोपियन इकॉनॉमिक युनियन मुंबई यांच्या सहकार्याने प्रतिष्ठानच्या इमारतीत घेण्यात आला.

- 'कडुलिंब' या झाडाचे औषधी उपयोग, या विषयी 'नीम फौंडेशन' यांच्या सहकार्याने प्रतिष्ठानमध्ये कॅसेटचे प्रकाशन आयोजित केले.

- ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड, पणन महामंडळ, पुणे व ठाणे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या सहकार्याने कलिंगड उत्पादकांचे ठाणे जिल्ह्यात आठ ठिकाणी मेळावे घेण्यात आले.

- युरोपमधील ताजी फळे व स्ट्रॉबेरी या पिकांच्या व्यापारासाठी आलेल्या श्री. ब्रायन क्रिस्टर व श्री. पीटर क्रिस्टर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची व निर्यातदारांची सभा प्रतिष्ठानमध्ये आयोजित केली व त्यांचा पुणे व नाशिक जिल्ह्यात दौरा आयोजीत करण्यांत आला.

- ठाणे जिल्हयातील आठ तालुक्यातील कलिंगड उत्पादकांचा एकत्रित मेळावा ठाणे जिल्हा परिषदेत घेण्यात आला.

- फार्मर्स क्लब, व हॉर्टीकल्चरल इस्टेट स्थापन करण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्हयातील वाडा येथे निवडक शेतकऱ्यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

- आदिवासी भागात महिलांच्या सहकारी सोसायटया स्थापन करुन छोटे उद्योग सुरु करण्यासाठी जव्हार, मोखाडा व देहरे येथे तीन शिबिरे प्रात्यक्षिकासहित घेण्यात आली.

- सहकारी महिला पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा पाच दिवसांचा वर्ग डोंबिवली येथे आयोजित करण्यात आला.

२०) **मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला उपक्रम (फोरम) :**

फोरमच्या वतीने मोफत सल्ला केंद्र चालविण्यात येत असून सदर केंद्रामार्फत अनेक लोकांना कायद्याचा मोफत सल्ला देण्यात येत आहे. फोरमच्या बैठका वेळोवेळी होत असतात.

- फोरम, राज्य मराठी विकास संस्था व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर ९५ मध्ये 'मराठीतून विधी आणि न्याय व्यवहार' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

- फोरम, मुंबई विद्यापीठ व लक्ष्मी-नृसिंह ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने २ डिसेंबर ९५ रोजी 'पर्यावरण व कायदे' याच्या संबंधी चर्चासत्र आयोजित करण्यात आले. तसेच फोरम व ठाणे विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जानेवारी ९६ रोजी महिलांसाठी 'स्त्रियांसंबंधीचे कायदे' यासंबंधी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

- मुंबई विद्यापीठातर्फे फेब्रुवारी ९६ मध्ये आयोजित केलेल्या 'ग्राहक संरक्षण कायदा' या विषयावरील चर्चासत्रमध्ये फोरमतर्फे भाग घेण्यात आला. फोरमचे काम परिणामकारक होण्याच्यादृष्टीने फोरमची नियमावली व अहवाल तयार करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला मिळणारे सर्वांचे सहकार्य व प्रेम यामुळेच प्रतिष्ठानची वाटचाल यशस्वीरित्या सुरु असून यापुढील काळात ती अधिक जोमाने होईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

विश्वस्त मंडळ / कार्यकारिणी
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**


यशवंतराव चव्हाण केंद्र
उद्‌घाटन
मा. श्री. आर. वेंकटरामन
यशवंतराव चव्हाण केंद्र
शिलान्यास
श्री. शरदराव पवार
यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला


Y. B. CHAVAN CENTRE